अग्रतश्चतुरो वेदा: पृष्ठत: सशरं धनु: ।
इदं ब्राह्ममिंद क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र



## भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या
## मन:पूर्वक शुभेच्छा...!
## जयहिंद..!



## संस्थेचे ९४ व्या वर्षात यशस्वी पदार्पण

स्थापना : भाद्रपद शु. ७ शके १८८५, दि.२७ ऑगस्ट १९३३

सर्व सभासद व हितचिंतकांना वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा...!




वर्ष ४८ वे
अंक ८ वा
१० ऑगस्ट २०२६
किंमत १ रुपया

## ''स्नेहबंध मैत्रिणींचा'' वतीने आषाढी एकादशी निमित्त काढण्यात आलेल्या दिंडीचे क्षणचित्रे....











# वारी पंढरपूरची...... एक अविस्मरणीय अनुभूती.



नमस्कार ! पांडुरंग हरी... वासुदेव हरी...

सन २०२६ मध्ये मला प्रथमच पंढरपूरच्या वारीला जाण्याचा योग आला. एक गोष्ट नेहमी ऐकायला मिळते ''जेव्हा आपल्या मनात एखाद्या पवित्र कार्याची इच्छा निर्माण होते, तेव्हा त्या इच्छेची व्यवस्था परमेश्वराने आधीच कुठेतरी करून ठेवलेली असते''. असाच अनुभव मलाही आला.

सन २०२४ मध्ये माझी नर्मदा परिक्रमा पूर्ण झाली. त्या परिक्रमेच्या दरम्यानच पंढरपूरच्या वारीला जाण्याचा मार्ग परमेश्वराने माझ्यासाठी खुला केला. नर्मदा परिक्रमेत माझी भेट वारकरी संप्रदायातील शरद थोरात महाराजांशी झाली. त्यांच्याशी परिचय झाला आणि त्यांचा मोबाईल क्रमांक मी जपून ठेवला. यावर्षी जेव्हा मी वारीला जाण्याचा निश्चय केला, तेव्हा मी त्यांच्याशी संपर्क साधला आणि योगायोग असा की, त्यांच्या दिंडीतूनच मला वारी करण्याचा अमूल्य योग लाभला.

पंढरपूरची वारी ही केवळ एक यात्रा नाही; ती एक अद्वितीय अनुभूती आहे. आपण दूरदर्शनवर किंवा सोशल मीडियावर वारकरी, भगवे झेंडे, पताका, टाळ-मृदंगाचा गजर, रिंगण आणि रिंगणात धावणारा अश्व पाहतो. पण या दृश्यांच्या मागे किती मोठे नियोजन, किती जणांचे अथक परिश्रम, किती त्याग आणि किती निःस्वार्थ सेवा दडलेली असते, याची खरी जाणीव वारीत प्रत्यक्ष सहभागी झाल्यावरच होते. वारी म्हणजे चालणे एवढेच नाही तर वारी म्हणजे शिस्त, सेवा, समर्पण, सहकार्य, भक्ती आणि नामस्मरणाचा अखंड प्रवाह! हा अनुभव शब्दांत पूर्णपणे व्यक्त करता येत नाही; तो प्रत्येकाने स्वतः अनुभवण्याचा विषय आहे.

अशा रीतीने वारीला जाण्याचा दिवस निश्चित झाला दि. १० जुलै २०२६. मूळ नियोजनानुसार ७ जुलैला नाशिकहून देहूला जाऊन दिंडीत सामील व्हायचे ठरले होते. पण ५ जुलैपासूनच मुसळधार पावसाच्या आणि पुराच्या बातम्या येऊ लागल्या. अनेक नद्यांना पूर आला होता, काही ठिकाणी पुलांवरून पाणी वाहत होते. प्रशासनानेही वारकऱ्यांना देहू आणि आळंदीकडे जाणे टाळण्याचे आवाहन केले होते, ही परिस्थिती पाहून ७ जुलैचा प्रवास रद्द करावा लागला. मग मी प्लॅन 'बी' तयार केला. ठरवले की, जर देहूतून जाता आले नाही तर १० जुलैला, जेव्हा दिंडी पुण्यात येईल, तेव्हा पुण्यातूनच दिंडीत सहभागी व्हायचे.

सुदैवाने पुढील दोन दिवसात हवामानात सुधारणा झाली. १० जुलैला मी नाशिकहून पुण्याला पोहोचलो आणि तिथून शरद थोरात महाराजांच्या दिंडीत सहभागी झालो. पहिल्या दिवशीचा मुक्काम पुण्यातील जाई पार्क येथे होता. तेथील रहिवाशांनी आपल्या इमारतीच्या बेसमेंटमध्ये वारकऱ्यांच्या मुक्कामाची सुंदर व्यवस्था केलेली होती. रात्री भजन, किर्तन आणि भारूडाचा कार्यक्रम झाला. या सर्व वातावरणामुळे वारीचा आध्यात्मिक प्रवास प्रत्यक्ष सुरू झाल्याची जाणीव झाली.

११ जुलै रोजी सकाळी सुमारे सात वाजता प्रत्यक्ष पदयात्रेला सुरुवात झाली. माझी ही पहिलीच वारी असल्यामुळे प्रत्येक गोष्ट माझ्यासाठी नवीन होती. वारकरी संप्रदायाचे नियम, परंपरा आणि शिस्त याविषयी मला फारशी माहिती नव्हती. माझे भाग्य असे की, मला पताकाधारी होण्याचा मान मिळाला. माझ्या हातात भगवा ध्वज देण्यात आला. वारी पूर्ण होईपर्यंत हा ध्वज आपल्या सोबतच ठेवायचा, अशी परंपरा आहे. प्रत्येक दिंडीत साधारण पाच पताकाधारी असतात. हे पताकाधारी दिंडीचे नेतृत्व करतात आणि संपूर्ण प्रवासात दिंडीला दिशा देतात. दिंडीचा प्रवास टप्प्याटप्प्याने पुढे सरकत राहिला. हडपसर, लोणी, यवत, वरबंड, वासुदेव, बारामती, कुरुळी, वाखरी अशा अनेक गावांमधून नियोजनाप्रमाणे मुक्काम करीत आम्ही पुढे जात होतो. चालताना सतत टाळ-मृदुंगांचा नाद, विठ्ठलनामाचा गजर आणि हजारो वारकऱ्यांची एकसुरात पडणारी पावले हा अनुभव शब्दात मांडणे कठीण आहे.

वाटेत अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या, बिस्किटे, फळे आणि अन्नदान करणारे सेवाभावी लोक दिसत होते. कोणत्याही अपेक्षेशिवाय सेवा करणाऱ्या या लोकांमुळे महाराष्ट्राची सेवाभावाची परंपरा प्रकर्षाने जाणवते. दररोज साधारण २० ते २२ किलोमीटर चालावे लागते. मात्र तीन दिवस असे असतात की जवळपास ३० किलोमीटरची पायपीट करावी लागते. तरीही नामस्मरणाच्या बळावर हा प्रवास सहज पार पडतो.

वारीतील एक महत्वाचा नियम म्हणजे मुख्य पालखीला कधीही ओलांडायचे नाही. पालखीच्या पुढे जाता येत नाही आणि मुक्कामाच्या ठिकाणीही पालखी निघाल्याशिवाय दिंडी पुढे जात नाही. हा नियम सर्वजण अत्यंत श्रद्धेने आणि शिस्तीने पाळतात. वारीत विविध वयोगटातील लोक सहभागी असतात. मात्र जवळून निरीक्षण केल्यावर असे जाणवले की ग्रामीण भागातील वारकऱ्यांची संख्या अधिक आहे. साधी राहणी, साधी भाषा, पण मनात प्रचंड भक्ती, नम्रता आणि उच्च विचार ही त्यांची खरी वैशिष्ट्ये आहेत. अनेक जण गेली वीस-पंचवीस, अगदी तीस वर्षे अखंड वारी करीत आहेत. आमच्या दिंडीत सुरुवातीला साधारण सत्तर जणांचा समूह होता.

प्रवास जसजसा पुढे सरकत गेला, तसतसे विविध गावांतील वारकरी त्या दिंडीत सामील होत गेले आणि दिंडी अधिक मोठी होत गेली.

संत तुकाराम महाराजांची पालखी देहूतून, तर संत ज्ञानेश्वर माऊलींची पालखी आळंदीतून निघते. दोन्ही पालख्यांचे मार्ग वेगवेगळे असले तरी अखेरीस त्या पंढरपूरमध्ये एकत्र येतात. तुकाराम महाराजांच्या पालखीसोबत सुमारे साडेचारशे नोंदणीकृत दिंड्या असतात, तर ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीसोबत त्याहूनही अधिक दिंड्या सहभागी असतात. प्रत्येक दिंडीत शेकडो वारकरी असतात. लाखो लोकांचा हा महासागर असूनही कुठेही गोंधळ, आरडा–ओरडा किंवा बेशिस्तपणा दिसत नाही. उलट शिस्त, समन्वय आणि परस्पर सहकार्य यांचे अप्रतिम दर्शन घडते.

प्रत्येक दिंडीची स्वतःची भोजन व्यवस्था असते. आचाऱ्यांची स्वतंत्र टीम असते. सकाळचा चहा–नाश्ता, दुपारचे जेवण आणि रात्रीचे भोजन वेळेवर मिळते. त्यामुळे अन्नाची कोणतीही चिंता रहात नाही. तसेच प्रत्येक दिंडीसोबत सामान वाहून नेणारे स्वतंत्र वाहन असते. त्यामुळे पाठीवर ओझे घेऊन चालावे लागत नाही. नर्मदा परिक्रमेप्रमाणे स्वतःचे सामान स्वतः वाहून नेण्याची गरज येथे नसते. त्यामुळे संपूर्ण लक्ष चालणे, नामस्मरण आणि आध्यात्मिक अनुभव घेण्यावर केंद्रित करता येते. वारीत सहभागी झालेल्या ज्येष्ठ वारकऱ्यांची ऊर्जा पाहून मी अक्षरशः थक्क झालो. वयाची साठी–सत्तरी ओलांडलेले अनेक वारकरी दिवसभर अखंड चालत होते. त्यांचा उत्साह आणि श्रद्धा पाहून आपल्यालाच प्रेरणा मिळते.

सरकारच्या नियोजनाचाही विशेष उल्लेख करावा लागेल. आपण अनेकदा सरकारवर टिका करतो; पण वारीच्या व्यवस्थापनात प्रशासनाचे उत्कृष्ट नियोजन प्रत्यक्ष अनुभवायला मिळाले. मार्गभर पिण्याच्या पाण्याचे टँकर, स्वच्छ आणि पुरेशी शौचालये, आरोग्य केंद्रे, डॉक्टर, रुग्णवाहिका, आपत्कालीन सेवा, तसेच वारकऱ्यांच्या पायांना मालिश करून देणारे स्वयंसेवक सतत कार्यरत होते. हे सर्व पाहून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की, वारी ही केवळ धार्मिक यात्रा नाही; ती श्रद्धा, सेवा, शिस्त, व्यवस्थापन आणि सामाजिक एकात्मतेचा एक जिवंत आदर्श आहे.

वारीमध्ये चालताना मला आणखी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, ती म्हणजे सेवेची भावना. प्रत्येक गावामध्ये हजारो लोक वारकऱ्यांच्या सेवेसाठी उभे असतात. कोणी पिण्याचे थंड पाणी देत असते, कोणी ताक, लिंबूपाणी किंवा चहा देत असते. कोणी फळांचे वाटप करत असते, तर कोणी गरमागरम खिचडी, पोळी–भाजी किंवा प्रसादाचे भोजन वाढत असते. या सर्वांच्या चेहऱ्यावर एकच आनंद दिसतो ''वारकऱ्यांची सेवा करण्याचे भाग्य मिळाले.''

काही ठिकाणी तर लहान मुलेही हातात पाण्याच्या बाटल्या घेऊन उभी असतात. वयस्कर महिला वारकऱ्यांच्या पायावर पाणी ओतून त्यांना आराम देताना दिसतात. काही स्वयंसेवक औषधे देतात, तर काही पायाला मलम लावून मालिश करतात. कोणालाही प्रसिद्धीची अपेक्षा नाही, मोबदल्याची अपेक्षा नाही; फक्त विठ्ठलसेवेचा आनंद.

वारीमध्ये चालताना मला एक गोष्ट सतत जाणवत होती. येथे कोणी श्रीमंत नाही आणि कोणी गरीब नाही. कोणी मोठा नाही आणि कोणी लहान नाही. सर्वांची एकच ओळख आहे ''आम्ही वारकरी आणि आम्ही विठ्ठलाचे.'' संपूर्ण प्रवासात कुठेही जातीचा, धर्माचा, पदाचा किंवा संपत्तीचा अहंकार जाणवत नाही. सर्वजण एकमेकांना ''माऊली'' म्हणून संबोधतात. हे एकच संबोधन माणसा–माणसातील सर्व भेद विसरायला लावते.

वारीतील आणखी एक अविस्मरणीय अनुभव म्हणजे रिंगण सोहळा. दूरदर्शनवर आपण रिंगण पाहतो, पण प्रत्यक्ष त्या वातावरणात उभे राहून तो अनुभव घेणे म्हणजे अंगावर रोमांच उभे राहतात. हजारो वारकरी विठ्ठलनामाचा गजर करीत असतात, टाळ–मृदुंगांचा निनाद सुरू असतो आणि पालखीचा अश्व जेव्हा रिंगणात दौड घेतो, तेव्हा संपूर्ण वातावरण भक्तीमय व उत्साहाने भरून जाते. वारकऱ्यांचा असा विश्वास आहे की हा अश्व म्हणजे माऊलींच्या उपस्थितीचे प्रतीक आहे. त्यामुळे अश्वाच्या पायाखालची मातीसुद्धा अनेक वारकरी कपाळी लावतात. त्या क्षणी प्रत्येकाच्या डोळ्यात श्रद्धा, आनंद आणि समाधान दिसते. दिवसभर चालून संध्याकाळी मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचल्यानंतर पुन्हा एक वेगळे जग सुरू होते. भजन, किर्तन, हरिपाठ, प्रवचने, भारूड, अभंग, गायन संपूर्ण वातावरण विठ्ठलनामाने दुमदुमून जाते. दिवसभराचा थकवा कधी नाहिसा होतो, हेच समजत नाही.

प्रवास जसजसा पंढरपूरच्या दिशेने पुढे सरकत होता, तसतशी प्रत्येक वारकऱ्याची आतुरता वाढत होती. अनेक दिवसांची पायपीट, उन्हाचा आणि पावसाचा सामना, कष्ट आणि श्रम हे सर्व आता विठ्ठलदर्शनाच्या आनंदासमोर अगदी क्षुल्लक वाटू लागले होते. आणि अखेर तो दिवस उजाडला... दूरवर पंढरपूरचे दर्शन होऊ लागले. ''पांडुरंग हरी... वासुदेव हरी...'', ''ज्ञानोबा–तुकाराम'' या जयघोषांनी संपूर्ण वातावरण दुमदुमून गेले. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर एक विलक्षण समाधान होते. अनेक वारकऱ्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू होते. वर्षभर ज्या क्षणाची वाट पाहिली होती, तो क्षण आता समोर उभा होता. विठ्ठलाच्या नगरीत प्रवेश करताना मनात एकच भावना होती कृतज्ञतेची. या वारीत सहभागी होण्याची संधी मिळाली, इतक्या चांगल्या दिंडीचा सहवास लाभला, हजारो सेवाभावी लोकांचे प्रेम अनुभवता आले आणि विठ्ठलाच्या चरणी येण्याचे भाग्य लाभले

यासाठी मनोमन परमेश्वराचे आभार मानले. या संपूर्ण वारीने मला एक मोठा जीवनधडा दिला. जीवनात शिस्त असेल, संयम असेल, परस्पर सहकार्य असेल आणि प्रत्येक कृतीत ईश्वराचे स्मरण असेल, तर कोणताही प्रवास कठीण रहात नाही. **वारी म्हणजे केवळ पंढरपूरपर्यंत चालत जाणे नाही ; वारी म्हणजे स्वतःच्या मनापर्यंत पोहोचण्याचा प्रवास आहे.**

आजही जेव्हा त्या दिवसांची आठवण येते, तेव्हा टाळांचा नाद कानात घुमू लागतो, भगव्या पताका डोळ्यांसमोर फडकू लागतात आणि नकळत ओठांवर एकच नाम येते

''पांडुरंग हरी... वासुदेव हरी...
ज्ञानोबा-तुकाराम!''

**रघुनाथ गद्रे (८७९३०८८८५२), नाशिक.**

## उद्योजक मंच मासिक सभा

मंगळवार दि. २१ जुलै २०२६ ची सभा अतिशय छान झाली. प्रत्येकाचे शॉर्ट इन्ट्रोडक्शन झाल्यावर श्री. नितीन मुजुमदार ह्यांनी आपल्यातील यशस्वी उद्योजकांच्या छोटेखानी मुलाखती दर महिन्याला एक ह्याप्रमाणे घेतल्यास सर्वांना घेण्यासारखे त्यातून खूप मिळेल, असे सुचवले. त्यासाठी नितीन मुजुमदार पुढाकार घ्यायला तयार आहेत. सर्वांना ही कल्पना आवडली. त्याचे डॉक्युमेंटेशन करून आपल्या संस्थेच्या यु ट्यूब आणि इंस्टाग्राम व फेसबुक चॅनल ला ते ठेवता येईल. तसेच काही मान्यवर उद्योजकांच्या फॅक्टरी किंवा चांगल्या प्रकल्पाला भेटी देता येतील अशीही चर्चा झाली. पावसामुळे आणि ट्राफिक जाम मध्ये अडकल्याने अनेक इच्छुक उद्योजक सभेला येऊ शकले नाहीत, त्यांना सर्वांनी मिस केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. त्यानंतर स्वादिष्ट अल्पोपहाराचा आनंद उपस्थितांनी घेतला.

**- चंद्रशेखर रानडे**

## ''स्नेहबंध मैत्रिणींचा'' वतीने आषाढी एकादशी निमित्त दिंडी

प्रतिवर्षी आषाढी वारी, दिंडी याचा आनंद, अनुभव आपण सगळे घेतोच. पण, या वर्षी स्नेहबंधने दर महिन्याच्या चौथा शनिवार कार्यक्रमांतर्गत दिंडी करायचे ठरवले आणि सख्यांच्या उत्साहाला उधाण आले. सभा घेऊन दोन तासाच्या कार्यक्रमाचे नियोजन आखले गेले. स्नेहबंध ग्रुपवर कार्यक्रम कळवून जास्तीत-जास्त संख्येने येण्यास सांगितले. हार, फुले, रांगोळ्या काढून पालखीही तयार करण्यात आली. पालखीत विठूरायाची मूर्ती उठून दिसत होती. डॉ. लेले सभागृहात टेबलावर विठ्ठल-रखुमाई तुळशीच्या हाराने सजले होते. सगळ्यांना कपाळी टिळा-बुक्का लावणं, गळ्यात सगळ्यांच्या केशरी पट्टा, टाळ, झांज, चिपळ्यांच्या आवाजात, विठूनामाच्या गजरात सजलेल्या पालखीसह बाजूच्या गल्लीतून दिलेल्या वेळेला दिंडीला सुरुवात झाली.

सभागृहाच्या फाटकाशी पालखी आल्यावर पाच जणींनी औक्षण केले. नामघोषात पालखी अंगणात आली आणि आवारात अभंग, गाण्यावर ध्वज आकाशी उंचावत सख्यांनी वारकरी भजनाचा गोल रिंगण करून भरभरून आनंद घेतला. सभागृहात पालखी आणली, पाठोपाठ मैत्रिणी स्थानापन्न झाल्या. गरमागरम कॉफीपान होताच दोघी/तिघींनी अभंग रचना सादर केल्या. नंतर आलेल्या प्रत्येकीला आरती ओवाळण्याचा आनंद घेता आला... 'येई वो विठ्ठले माझे माऊली गे' आरती तर छानच जोशात झाली... पंढरपूर मंदिरात असल्यासारखे वाटले. मंत्रपुष्पांजलीने आरतीची पूर्तता होऊन विठूनामाचा जयघोष झाला, प्रसाद वाटप झाले. जाताना मैत्रिणींनी 'दिंडी छान झाली', अशी उत्कृष्ट नियोजनाची पावती दिली...!!!

कार्यालयीन मंडळींनी चांगले सहकार्य केले. सारडा शाळेकडून पालखी मिळाल्याने दिंडीची शोभा वाढली. पर्जन्यराजाला शतशः धन्यवाद ! गेला आठवडा राज्यभर मुसळधार पावसाने थैमान घातले असतांना, दिंडी कालावधीत चक्क ऊन होते. विठूरायाचा कृपाशीर्वादाच जणू !! स्नेहबंधने आणि तेही परशुराम भवन येथे आयोजित ही पहिल्यांदाच केलेली दिंडी होती. संस्था अशा वेगवेगळ्या उपक्रमांना नेहमीच प्रेरणा देत असते. त्यामुळे दिंडी उत्साहात, आनंदात संपन्न झाली. पसायदानाने दिंडीची सांगता झाली. घरी पोहोचल्यावर पावसाने हजेरी लावली.

### ''स्नेहबंध मैत्रिणींचा'' ऑगस्टमधील कार्यक्रम - 'हळदी-कुंकू'

**श्रावण म्हटला की महिला वर्गाची गडबड सुरू होते.... नागपंचमी, मंगळागौरी, इत्यादी निमित्ताने आपणही एकमेकींना भेटून आनंद घेतो... हाच आनंद द्विगुणित करण्यासाठी स्नेहबंध मैत्रिणींचा श्रावण शुक्रवारचे हळदीकुंकू करणार आहोत... त्या निमित्त दोन स्पर्धा आयोजित केल्या आहेत. येताना पेन आणि कागदाखाली धरायला जाड पुठ्ठा किंवा वही आणावी....कागद संस्थेतून मिळेल... छान नटून-थटून या**

**दिनांक :- शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट २०२६ वेळ :- संध्याकाळी ५.३० वा.**
**ठिकाण :- श्री परशुराम भवन, डॉ. लेले सभागृह**

# वारी... अनुभूती भक्तीची, समाधानाची



खरं तर दोन वर्षांपूर्वी एकदा वारीचा अनुभव घेण्याचा प्रयत्न केला होता. पुणे ते सासवड या मार्गावर साधारण पाच किलोमीटर चालून परत यावे लागले. पाऊस आणि इतर काही कारणांमुळे तो प्रयत्न पूर्णत्वास जाऊ शकला नाही. गेल्या वर्षी आपल्या चित्तपावन नाशिक ग्रुपने पुणे ते सासवड वारी करण्याचे ठरविले होते. दुर्दैवाने त्यावेळीही त्यांच्या सोबत जाण्याची संधी मिळाली नाही. मात्र, त्यांनी सांगितलेले अनुभव आणि वारीनंतर त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधान व आनंद पाहून मनावर खोल ठसा उमटला. तेव्हाच ठरवलं, यंदा काहीही झाले तरी वारीला जायचेच!

या निर्णयामागे खरी प्रेरणा म्हणजे श्री. सुधीर दामले. त्यांनी गेल्या वर्षी संपूर्ण २१ दिवसांची पायी वारी पूर्ण केली आणि यंदाही ते पुन्हा त्याच भक्तिभावाने मार्गस्थ झाले होते. त्यांचा उत्साह, श्रद्धा आणि चिकाटी यामुळे मलाही वारीची ओढ अधिकच लागली.

वारीचा मुक्काम पुण्याहून सासवड येथे पोहोचल्यावर आम्ही गाडीने आळंदीकडे प्रस्थान केले. दोन दिवसांपूर्वी आलेल्या पुरामुळे बंद झालेले रस्ते सुदैवाने आमच्यासाठी खुले झाले होते. इंद्रायणीच्या पवित्र तीरावर श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधीचे दर्शन घेतले आणि त्या क्षणी मन अत्यंत शांत, प्रसन्न व भक्तिभावाने भरून गेले. वारीची सुरुवातच अशा मंगल दर्शनाने झाल्यामुळे पुढील प्रवासासाठी एक वेगळीच आध्यात्मिक ऊर्जा लाभल्याची अनुभूती आली.माझ्यासोबत अनुभवी वारकरी सर्वश्री सुधीर दामले, अभय खरे, चंद्रशेखर रानडे, सुशील सहस्त्रबुद्धे, हेरंब घारपुरे आणि अमित देवधर हे सहप्रवासी होते. मगरपट्टा परिसरात दिवसासाठी एक सदनिका भाड्याने घेऊन विश्रांती केली आणि दुसऱ्या दिवशी ब्रह्ममुहूर्तावर सासवडकडे प्रस्थान केले.

संत सोपानकाकांच्या समाधीचे दर्शन घेऊन, प्रसादरूपी पोटपूजा करून खऱ्या अर्थाने आमच्या वारीला सुरुवात झाली. ''रामकृष्ण हरी''च्या अखंड गजरात, टाळ–मृदंगाच्या निनादात आणि माऊलींच्या सहवासात प्रत्येक पाऊल आनंद, समाधान आणि भक्तीने भारावून गेले.

जवळपास अर्धे अंतर पूर्ण केल्यानंतर आम्ही थोडा विसावा घेतला. त्याचवेळी एका दुःखद अपघाताची बातमी समजली. त्या क्षणी मन विषण्ण झाले आणि जीवनाच्या अनिश्चिततेची पुन्हा एकदा जाणीव झाली. वारी आपल्याला समत्व, संयम आणि प्रत्येक क्षण कृतज्ञतेने जगण्याची शिकवण देते, याचा प्रत्यय आला.आम्ही जेजुरीला पोहोचलो; मात्र प्रचंड गर्दी आणि त्याच दिवशी नाशिकला परतायचे असल्याने खंडोबाच्या गडावर जाणे टाळावे लागले. त्यानंतर मोरगावच्या श्री मयुरेश्वर गणरायाचे दर्शन घेऊन आमच्या या टप्प्यातील वारीची सांगता झाली. मात्र सुधीर दामले पुढील प्रवासासाठी पुन्हा माऊलींच्या दिंडीसोबत मार्गस्थ झाले. परतीच्या प्रवासात आम्ही सर्वांनी पुढील वर्षी जेजुरी ते वेल्हे हा टप्पा पायी पूर्ण करण्याचा निश्चय केला. विशेष म्हणजे, दुसऱ्या दिवशी कोणालाही कोणताही त्रास झाला नाही आणि सर्व माऊली आपापल्या दैनंदिन कामाला रुजू झाल्या.

वारी संपली असली तरी मन मात्र अजूनही त्या भक्तिमय वातावरणात रमले आहे. आता ओढ लागली आहे ती पुढील वारीची...

**– हेमंत वाड**

## ‘श्रावणी’

**रविवार दि.१६ ऑगस्ट २०२६, या दिवशी सकाळी ७ वाजता डॉ. लेले सभागृह, परशुराम भवन, जुना आग्रा रोड, नाशिक येथे श्रावणीचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. सदर कार्यक्रमास येताना आपले बसायचे आसन, सोवळे, पळी, भांडे, ताम्हण, लोटी, जानवी जोड बरोबर घेऊन यावे. कार्यक्रम वेळेवर सुरू होईल.**

### चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

## देणगीदार - जुलै २०२६

| क्रमांक | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ०१ | श्री. शिरीष शंकर आठवले (शिष्यवृत्ती वाटपाकरिता) | १०,०००/- |
| ०२ | श्री. सुधीर बाळकृष्ण फडके (कै.बी.व्ही.फडके यांच्या स्मरणार्थ) | २५,०००/- |

## चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

# शिष्यवृत्ती व पारितोषिके : सन २०२५-२०२६

| अ.क्र. | शिष्यवृत्ती | विषय | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१. | र. के. पटवर्धन | अभियांत्रिकी प्रवेशासाठी | ५,०००/- |
| ०२. | चिंतामणी दामोदर तथा भैय्यासाहेब दांडेकर | अभियांत्रिकी प्रवेशासाठी | १५,०००/- |
| ०३. | नारायण गणेश पेंडसे | अभियांत्रिकी प्रवेशासाठी | २,०००/- |
| ०४. | ल. श्री. ताम्हणकर | अभियांत्रिकी प्रवेशासाठी | १,५००/- |
| ०५. | दत्तात्रय नरहर बर्वे | अभियांत्रिकी प्रवेशासाठी | ५,०००/- |
| ०६. | सावित्रीबाई बर्वे | अभियांत्रिकी (संगणक) | ५,०००/- |
| ०७. | पटवर्धन उत्कर्ष मंडळ | अभियांत्रिकी प्रवेशासाठी | ७००/- |
| ०८. | रामचंद्र वासुदेव पळनिटकर | अभियांत्रिकी प्रवेशासाठी | ५००/- |
| ०९. | राधा दामोदर साने | अभियांत्रिकी प्रवेशासाठी | १००/- |
| १०. | भास्कर रा. अभ्यंकर | बी.ई.मेकॅ. / इले. / इंजिनिअर | ५००/- |
| ११. | दत्तात्रय रा. अभ्यंकर | बी.ई.मेकॅ. / सिव्हिल / कॉम्प्यु. इंजि. | ५००/- |
| १२. | र. के. पटवर्धन | वैद्यकिय प्रवेशासाठी | ५,०००/- |
| १३. | विश्वनाथ नारायण पेंडसे | वैद्यकिय प्रवेशासाठी | २,०००/- |
| १४. | ल. श्री. ताम्हणकर | वैद्यकिय प्रवेशासाठी | १,५००/- |
| १५. | डॉ. प्रभाकर दातार | वैद्यकिय प्रवेशासाठी | १,५००/- |
| १६. | दुर्गाबाई मराठे | नर्सिंग किंवा वैद्यकिय प्रवेशासाठी | ७००/- |
| १७. | काशिनाथ शिवराम चिपळूणकर | आयुर्वेद प्रवेशासाठी | १,०००/- |
| १८. | कै. प्रभावती वासुदेव उपासनी | नर्सिंग | २५०/- |
| १९. | कै. आरती निखिल वैशंपायन | एम. बी. ए. (फायनान्स) प्रविष्ट | १,२५०/- |
| २०. | वि. भा. लोंढे | चित्रकला / शिल्पकला | ५००/- |
| २१. | नारायण दत्तात्रय चिपळूणकर | चित्रकला / फाईन आर्ट | १५०/- |
| २२. | पुरुषोत्तम महादेव मेहेंदळे | संगीत | ३५०/- |
| २३. | कै. माधव (पंडितराव) पुरुषोत्तम वैशंपायन | बी. एस्सी. - प्रथम वर्ष | २,५००/- |
| २४. | कै. श्रीमती पुष्पलता माधव वैशंपायन | बी. कॉम. - प्रथम वर्ष | २,५००/- |
| २५. | नि. ल. भावे | १२ वी वाणिज्य | २००/- |
| २६. | दामोदर रावजी रानडे | १२ वी वाणिज्य अकौन्टन्सी | ३५१/- |
| २७. | गोपाळ वि. दांडेकर | १२ वी वाणिज्य अकौन्टन्सी | ७००/- |
| २८. | श्रीकांत दाते | १२ वी वाणिज्य | ३५०/- |
| २९. | मधुकर फाटक | १२ वी वाणिज्य | २५०/- |
| ३०. | बाळकृष्ण मोरेश्वर वेलणकर | १२ वीत प्रथम | २,५००/- |
| ३१. | श्रीमती सफला शिवाजी आपटे | १२ वी सर्वप्रथम | २,५००/- |
| ३२. | ग्रुप कॅप्टन कै. पंकज पांडुरंग साठे | १२ वीत फिजिक्समध्ये प्रथम | १,७५०/- |
| ३३. | हरिहर गणेश जोगळेकर | १० वी | ५५०/- |
| ३४. | शं. पु. जोशी | १० वी | १००/- |
| ३५. | विश्वनाथ रघुनाथ गद्रे | १० वी | १००/- |

## चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

# शिष्यवृत्ती व पारितोषिके : सन २०२५-२०२६

| अ.क्र. | शिष्यवृत्ती | विषय | रक्कम |
|---|---|---|---|
| ३६. | श्रीमती राजाबाई राजवाडे | १० वी | ५०/- |
| ३७. | वे. गोविंद मनोहर उर्फ गोविंद दीक्षित | १० वी | ५०/- |
| ३८. | कु. लिला दामोदर रानडे | १० वी संस्कृत | ३५१/- |
| ३९. | अंबादास ग. वैशंपायन | १० वी संस्कृत | १००/- |
| ४०. | लक्ष्मी जनार्दन | १० वी संस्कृत | १००/- |
| ४१. | कै. त्रिविक्रम बापट | १० वी संस्कृत विषयात प्रथम | ५००/- |
| ४२. | कै. आशिष अशोक दामले | १० वीत गणितात प्रथम | ३५०/- |
| ४३. | राधाबाई दामोदर रानडे | १० वी मराठी | ३५१/- |
| ४४. | इंदिराबाई गोळे | १० वी मराठी | १००/- |
| ४५. | वंदना जोगळेकर | १० वी मराठी | ३५०/- |
| ४६. | विष्णू गोविंद दातीर | १० वी इंग्रजी/ गणित | १५१/- |
| ४७. | प्रभाकर दामोदर रानडे | १० वी इंग्रजी | ३५१/- |
| ४८. | लक्ष्मण हरी तथा आबासाहेब घारपुरे | १० वी इंग्रजी / संस्कृत | ३५१/- |
| ४९. | अभय भास्कर वैद्य | १० वी इंग्रजी | १००/- |
| ५०. | प्रतिभा सावरकर | १० वी इंग्रजी | ३५१/- |
| ५१. | दिगंबर दत्तात्रय मराठे | १० वी इंग्रजी | ५००/- |
| ५२. | विनायक प्रभाकर घारपुरे | १० वी समाजशास्त्र | ३५०/- |
| ५३. | रामचंद्र गोपाल कुंटे सर | १० वी गणित | ५००/- |
| ५४. | काशिनाथ रामचंद्र साठे | १० वी गणित | ५००/- |
| ५५. | रामचंद्र नारायण भिडे | १० वी विज्ञान | ५००/- |
| ५६. | शैलजा मधुकर ओगले | १० वी विज्ञान | २५०/- |
| ५७. | कमलाबाई जनार्दन अभ्यंकर | हुषार / होतकरू | २,०००/- |
| ५८. | मिलिंद त्रिंबक केतकर | हुषार / होतकरू | ५००/- |
| ५९. | गोविंद रघुनाथ दातीर | हुषार / होतकरू | १००/- |
| ६०. | प्र. शि. जोगळेकर | हुषार / होतकरू | ५००/- |
| ६१. | कृ. धों. मराठे | हुषार / होतकरू | १००/- |
| ६२. | तात्यासाहेब दांडेकर (खार) | हुषार / होतकरू | ५०/- |
| ६३. | लक्ष्मीबाई छत्रे | हुषार / होतकरू | ५०/- |
| ६४. | दिवाकर रहाळकर | हुषार / होतकरू | ५०/- |
| ६५. | नागनाथ विनायक परांजपे | हुषार / होतकरू | ३५०/- |
| ६६. | सौ. शांताबाई बालाजी आगाशे | हुषार / होतकरू | ३५०/- |
| ६७. | बालाजी कृष्णाजी आगाशे | हुषार / होतकरू | ३५०/- |
| ६८. | गं. भा. सत्यभामाबाई कृष्णाजी आगाशे | हुषार / होतकरू | ३५०/- |
| ६९. | वसंत रामकृष्ण गोवंडे | हुषार / होतकरू | ३५०/- |
| ७०. | मुकुंद महादेव पिंपळखरे | हुषार / होतकरू | ३५०/- |

## चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

# शिष्यवृत्ती व पारितोषिके : सन २०२५-२०२६

| अ.क्र. | शिष्यवृत्ती | विषय | रक्कम |
|---|---|---|---|
| ७१. | गणेश विष्णू थोरात | हुषार / होतकरू | ५००/- |
| ७२. | सरस्वती गणेश थोरात | हुषार / होतकरू | ५००/- |
| ७३. | विष्णू केशव बापट | हुषार / होतकरू | ७००/- |
| ७४. | वासुदेव गणेश कान्हेरे | हुषार / होतकरू | ३५०/- |
| ७५. | यमुनाबाई न. कान्हेरे | हुषार / होतकरू | ३५०/- |
| ७६. | गंगाधर कृ. आगाशे | हुषार / होतकरू | ३५०/- |
| ७७. | मोरेश्वर कृ. आगाशे | हुषार / होतकरू | ३५०/- |
| ७८. | दत्तात्रय विठ्ठल कर्वे | हुषार / होतकरू | ५००/- |
| ७९. | सुशिला ना. गोखले | हुषार / होतकरू | १,२५०/- |
| ८०. | नारायण चि. साने | हुषार / होतकरू | ५००/- |
| ८१. | वासुदेव परशुराम घारे | हुषार / होतकरू | ५००/- |
| ८२. | द्वारकानाथ साठे | हुषार / होतकरू | ६,०००/- |
| ८३. | इंदिरा द्वारकानाथ साठे | हुषार / होतकरू | ६,०००/- |
| ८४. | कै. अरविंद रामचंद्र आमडेकर | हुषार / होतकरू | ५००/- |
| ८५. | वंदना जोगळेकर | हुषार / होतकरू | ३५०/- |
| ८६. | शैलजा म. ओगले | हुषार / होतकरू | २५०/- |
| ८७. | सीताबाई रघुनाथ परांजपे | हुषार / होतकरू | २५०/- |
| ८८. | वसुधा वासुदेव घारे | हुषार / होतकरू | २५०/- |
| ८९. | कै. बाळकृष्ण वामन फडके | हुषार / होतकरू | २५१/- |
| ९०. | कै. आनंद विनायक फडके | हुषार / होतकरू | ५,०००/- |
| ९१. | कै. शंकर नरसिंह जोगळेकर | हुषार / होतकरू | ७००/- |
| ९२. | वासुदेव केशव जोशी | हुषार / होतकरू | १,२५०/- |
| ९३. | इंदिरा वासुदेव जोशी | हुषार / होतकरू | १,२५०/- |
| ९४. | सौ. मालती मधुकर सावरकर | हुषार / होतकरू | ५५०/- |
| ९५. | कै. यशवंत केशव सहस्त्रबुद्धे | हुषार / होतकरू | ५००/- |
| ९६. | कै. मधुकर दातार | हुषार / होतकरू | १,२५०/- |
| ९७. | मनोहर दातार | हुषार / होतकरू | १,२५०/- |
| ९८. | कै. विश्वनाथ त्र्यंबक रानडे | हुषार / होतकरू | ७५०/- |
| ९९. | सौ. शोभना गोपाळ खरे व श्री. गोपाळ केशव खरे | हुषार / होतकरू | १,०००/- |
| १००. | कै. अनिरुद्ध दांडेकर | हुषार / होतकरू | ५,०००/- |
| १०१. | कै. रघुनाथ यशवंत लिमये व कै. विजय विश्वनाथ गद्रे | हुषार / होतकरू | ५००/- |
| १०२. | कै. सौ. मंगलाताई व कै. माधवराव जोशी | हुषार / होतकरू | ५,०००/- |
| १०३. | कै. सौ. राधाबाई विश्वनाथ पेंडसे | हुषार / होतकरू | १०,०००/- |
| १०४. | कै. विश्वनाथ नारायण पेंडसे | हुषार / होतकरू | १०,०००/- |
| १०५. | श्रीमती मालती मधुसुदन जोगळेकर | हुषार / होतकरू | ५००/- |

## चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

# शिष्यवृत्ती व पारितोषिके : सन २०२५-२०२६

| अ.क्र. | शिष्यवृत्ती | विषय | रक्कम |
|---|---|---|---|
| १०६. | कै. प्रमिला राजाराम गद्रे | हुषार / होतकरू | १,०५०/- |
| १०७. | कै. शंकर रामकृष्ण आठवले | हुषार / होतकरू | ५५०/- |
| १०८. | कै. दत्तात्रय बापूराव सहस्त्रबुद्धे | हुषार / होतकरू | ७००/- |
| १०९. | जानकीबाई / सीताबाई गोविंद नामजोशी | भिक्षुकी शिकणाऱ्या विद्यार्थ्यास | २५०/- |
| ११०. | श्री. शैलेंद्र पुजारी - परिवार | हुषार / होतकरू | ५००/- |
| १११. | कै. गोपाळ वासुदेव दातार | हुषार / होतकरू - मुलासाठी | ५००/- |
| ११२. | कै. सौ. मेधा धनंजय दातार | १० वी मराठी प्रथम - मुलीसाठी | ५००/- |
| ११३. | सौ. विद्या रविंद्र मराठे | हुषार / होतकरू | १,२५०/- |
| ११४. | कै. केशव घांघुर्डे | हुषार / होतकरू | १,५००/- |
| ११५. | कै. सदाशिव काळे | हुषार / होतकरू | ५,०००/- |
| ११६. | सौ. विनया विवेक बापट | हुषार / होतकरू | २५०/- |
| ११७. | कै. मोहन माधव वैशंपायन | हुषार / होतकरू | ५,०००/- |
| ११८. | कै. सौ. हेमा अविनाश लेले | हुषार / होतकरू | १,७५०/- |
| ११९. | उषा करमरकर | १० वीत मराठी विषयात प्रथम | १,५००/- |
| १२०. | सौ. मालती मधुकर सावरकर | गरजू विद्यार्थ्यास | ६००/- |
| १२१. | कै. मधुसुदन व कै. मालती जोगळेकर | गरीब व होतकरू विद्यार्थ्यासाठी | ६००/- |
| १२२. | कै. प्रभाकर दिनकर खरे व कै. प्रभावती प्रभाकर खरे | हुषार / होतकरू विद्यार्थ्यासाठी | १,८००/- |
| १२३. | कै. वासुदेव परशुराम घारे | हुषार / होतकरू | ९००/- |
| १२४. | श्रीमती विमल प्रभाकर लोंढे | हुषार / होतकरू | ३,०६०/- |
| १२५. | कै. दामोदर रघुनाथ बापट | हुषार / होतकरू | ९००/- |
| १२६. | कै. निशिकांत दिनकर ताम्हणकर | बी.कॉम. मध्ये प्रथम येणाऱ्यास | ९००/- |
| १२७. | सौ. गीता शारंगपाणी साठे | हुषार / होतकरू विद्यार्थीच्या शिक्षणासाठी | ५,०००/- |
| १२८. | सौ. मीना दिवाकर मुजुमदार | हुषार / होतकरू विद्यार्थिनीसाठी | ३५०/- |
| १२९. | कै. पार्वताबाई महादेव साठे | हुषार / होतकरू | १,२५०/- |
| १३०. | कै. महादेव विश्वनाथ साठे | हुषार / होतकरू | १,२५०/- |

## गुणगौरवासाठी खालील विद्यार्थी / विद्यार्थिनी पात्र आहेत

१) १० वी परीक्षेत ८०% अथवा जास्त गुण प्राप्त
२) १२ वी परीक्षेत ७५% अथवा जास्त गुण प्राप्त
३) पदवी / पदव्युतर परीक्षेत ६०% अथवा जास्त गुण प्राप्त
४) विशेष प्राविण्य - इतर कुठल्याही शैक्षणिक क्षेत्रातील कला, क्रिडा, संगीत इत्यादी मधील विशेष गुणवत्ता प्राप्त

**शिष्यवृत्ती व पारितोषिके (गुणगौरव) साठी करावयाचे अर्ज संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध आहेत.**

**अर्ज स्विकारण्याची अंतिम मुदत २० ऑगस्ट २०२६**

- **संस्थेतर्फे दरवर्षी शिष्यवृत्ती व पारितोषिके प्रदान करण्यात येतात.**
- **ज्या विद्यार्थ्यांनी आपले अर्ज अद्याप संस्थेकडे दिले नसतील त्यांनी ते लवकरात लवकर कार्यालयात जमा करावेत.**
- **अर्जाचे फॉर्मस् कार्यालयात उपलब्ध आहेत.**



उद्योजक मंचाची जुलै महिन्यातील सभा उत्साहात संपन्न




पंढरपूरच्या वारीत सामील झालेले रघुनाथ गद्रे



## श्री गणेशोत्सव - २०२६

**सोमवार १४ सप्टेंबर २०२६ रोजी**
**श्री गणेश प्रतिष्ठापना सकाळी १० वा**
श्री अथर्वशीर्ष पठण सायंकाळी ६ वाजता

शनिवार १९ सप्टेंबर २०२६ श्री गणेश विसर्जन

रविवार २० सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता
**पावन स्वर आयोजित पंडीत भाग्येश मराठे**
यांचा शास्त्रीय- उप शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम

**वरील सर्व कार्यक्रम**
**श्री परशुराम भवन येथे होतील.**




पंढरपूरच्या वारीत सहभागी हेमंत वाड, अभय खरे, चंद्रशेखर रानडे, सुशील सहस्त्रबुद्धे, सुधीर दामले, हेरंब घारपुरे आणि अमित देवधर

## चित्तपावन ब्राह्मण संघ : वधू यादी

| नाव, पत्ता व फोन | जन्म तारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| **कुमारी श्रृतिका दिलीप ओक**<br>६४९, अभोणकर लेन, रविवार पेठ, नाशिक<br>नाशिक. मो. ९६८९२६६७३६ | २०/१२/१९९९ | वसिष्ठ | ५'.३'' | बी.आर्कि. | ----- |

## चित्तपावन ब्राह्मण संघ : वर यादी

| नाव, पत्ता व फोन | जन्म तारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| **कुमार अमोल अतुल ओगले**<br>बालाजी स्काईज समोर, निपानिआ, इंदौर<br>मोबा.: ९४०६६३१४७९ | १८/११/१९९८ | काश्यप | ५'.१०'' | बी.ई. मेकॅनिकल | २ लाख |

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेच्या मालकीचा हा अंक संपादक व **प्रकाशक श्री. विजय राजाराम साने,** यांनी श्री गणेश एंटरप्राईजेस, शिवनेरी कॉम्प्लेक्स, वावरे लेन, शिवाजी रोड, शालीमार, नाशिक येथे छापून **'श्री परशुराम भवन'**, स्टेट बँकेसमोर, सी.बी.एस. नाशिक-४२२००२ येथे प्रसिद्ध केला.

**चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक. फोन : ०२५३-२५७६२४१**

प्रति, ______________________

______________________

______________________

**संस्थेची वेबसाईट :-**

- Website : www.nasikchitpavan.org
- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http://twitter.com/nasikchitpavan
- http://facebook.com/nasikchitpavan
- http://youtube.com./user/nasikchitpavan

या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. 'चित्तपावन मित्र'च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.

RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकिटे लाऊन पोस्टाने पाठविण्याचा परवाना NSK / RNP-231/2021-2023
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O. मधून वितरित केला जातो.